# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व),मुंबई५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल-romumbai@dtemaharashtra.gov.in website – www.jdteromumbai.com


स्मरणपत्र
परिपत्रक

क्र. ३/विकामुं/लेखा/पीएलए/२०१९/१२०२

दिनांक : 23 APR 2019

विषय : स्विय प्रपंजी लेख्यानुसार (पी.एल.ए.) आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध बाबींवर करावयाचे खर्चाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करणेबाबत. . . . . . . . . . . . . . . . . . . . .

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.नि.क्र. पीएलए-२०१५/(प्र.क्र.१६८/२०१५)/तांशि-३, दि. ०१/०१/२०१८
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एनजीसी/पीएलए/ २०१९/ २६७, दि. १२/०३/२०१९
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३/विकामुं/लेखा/पीएलए/२०१९/९०६, दि. १९/०३/२०१९
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे स्मरणपत्र क्र. १०/एनजीपी/मान्यता/ २०१९/३९४, दि. १५/०४/२०१९

उपरोक्त संदर्भाकीत विषयानुसार विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना कळविण्यांत येते की, संदर्भीय क्र.१च्या शासन निर्णयानुसार संस्थांमधील स्विय प्रपंजी लेख्यातील (पीएलए) रकमेच्या विनियोजनाबाबत सर्वसमावेशक धोरण ठरविण्यांत आलेले आहे. त्यानुसार संस्थास्तरावरील हस्तांतरणीय बाबींवरील निधीमधून करावयाच्या खर्चाची नियमावली ठरवून देण्यांत आलेली असून खर्च करण्यासाठी प्रत्येक शासकीय संस्थेने त्या त्या वर्षीच्या ३१ मार्च पर्यंत संचालनालयास मान्यतेकरीता सादर करण्याबाबत नमूद करण्यांत आले आहे.

त्यानुसार सर्व शासकीय संस्थांना संदर्भीय क्र. २च्या पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भीय क्र. ४चे परिपत्रक निर्गमीत करण्यांत आले होते संदर्भीय क्र.१च्या शासन निर्णयातील नमूद तरतूदीनुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीचे आपल्या संस्थेतील स्विय प्रपंजी लेख्यामधून संस्था स्तरावर हस्तांतरणीय बाबींच्या जमा निधीमधून वार्षिक खर्चाचे अंदाजपत्रकाची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्र 'अ' व 'ब' मध्ये भरुन या कार्यालयास दि. २६/०३/२०१९ पर्यंत सादर करावी. तसेच सदरची माहिती Excel sheet मध्ये Sakal Marathi या Font मध्ये भरुन Soft व Hard Copyच्या स्वरुपात देण्यात यावी. Soft Copy या कार्यालयाच्या romumbai@dtemaharashtra.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यांत यावी. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्य केलेल्या अंदाजपत्रकाव्यतिरिक्त संस्थांनी स्विय प्रपंजी लेख्यातून खर्च केल्यास ती वित्तीय अनियमितता होईल व त्यासाठी संबंधीत संस्था प्रमुख जबाबदार राहतील. याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

परंतु अद्यापपर्यंत वरील अंदाजपत्रक शासकीय संस्थांनी सादर केलेले नाही. याबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी संदर्भीय क्र.४ अन्वये स्मरणपत्रही दिलेले आहे. त्यानुषंगाने सर्व संबंधीत संस्थांना पुन्हा कळविण्यांत येते की, सदर प्रकरण कालमर्यादीत असल्याने तात्काळ वरीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर करावे. अन्यथा दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यांत येणार नाही याची नोंद घेण्याबाबत मुख्य कार्यालयाने कळविलेले आहे.

(विजय ल. भांगरे)
सहाय्यक संचालक (अतां.)
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

सहपत्रे : वरीलप्रमाणे

प्रत : सर्व शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, रत्नागिरी

D:\MANKAR1\MKB\BEHERE SIR\Account Related\Circulars\For Institutes.docx